दिवाणी न्यायाधीश (क.स्त.) व न्यायदंडाधिकारी (प्र.व.) मुख्य परीक्षा 2020
परीक्षा दि. २५ सप्टेंबर, 2021

2020

**D14**

# PAPER - II / पेपर क्रमांक - II

**Indian Penal Code, Evidence Act, Code of Criminal Procedure, SC & ST (Prevention of Atrocities) Act, 1989 and Protection of Civil Rights Act, 1955, Essay on Current Legal Topic**

**इंडियन पिनल कोड, एव्हीडन्स ॲक्ट, कोड ऑफ क्रिमिनल प्रोसिजर, एससी अँड एसटी ( प्रिव्हेन्शन ऑफ अॅट्रासिटीज ) ॲक्ट, 1989 अँड प्रोटेक्शन ऑफ सिव्हिल राईटस् ॲक्ट, 1955, करंट लिगल टॉपिकवरील निबंध**

**Time : 3 hours**
**वेळ : 3 तास**

**Max. Marks : 100**
**गुण : 100**

---

*Note / **सूचना**:*

(1) *Question Nos.* ***9*** *and* ***10*** *are* ***compulsory.***
*प्रश्न क्रमांक* ***9*** *व* ***10 अनिवार्य*** *आहेत.*

(2) *Answer any* ***six*** *from the remaining questions.*
*उर्वरित प्रश्नांमधून कोणतेही* ***सहा*** *प्रश्न सोडवावेत.*

(3) *Marks to each question are indicated by a figure in the margin on the right hand side.*
*प्रश्नासमोरील उजव्या बाजूच्या समासातील अंक गुण दर्शवितात.*

(4) *Wherever option has been given only the required number of responses in the serial order attempted shall be assessed. Excess responses shall be ignored.*
*ज्या क्रमाने उमेदवाराने ऐच्छिक प्रश्न सोडविलेले असतात त्या क्रमाने अपेक्षित प्रश्नसंख्येइतक्या प्रश्नांची उत्तरे फक्त तपासली जातील व उर्वरित अतिरिक्त ठरणाऱ्या प्रश्नांची उत्तरे तपासली जाणार नाहीत.*

(5) *Do not reproduce any question. Write only question's number against the answer.*
*उत्तरपुस्तिकेमध्ये प्रश्न पुन्हा लिहू नयेत. फक्त प्रश्न क्रमांक नमूद करून उत्तर लिहावे.*

(6) *"Other than cited cases, candidate should not write roll number, any names (including their own), signature, address or any indication of their identity anywhere inside the answer book otherwise he will be penalised."*
*"उदाहरणदाखल दिलेल्या प्रकरणांशिवाय उत्तरपुस्तिकेच्या आतील भागात कोठेही उमेदवाराने बैठक क्रमांक, स्वत:चे किंवा इतरांचे नाव, सही, पत्ता किंवा आपली ओळख देणारे चिन्ह नमूद करू नये अन्यथा तो शिक्षेस पात्र ठरेल."*

(7) ***English*** *version of the question shall be authentic in case of any type of ambiguity.*
*कोणत्याही प्रकारच्या संदेहाच्या स्थितित,* ***इंग्रजी*** *भाषांतर अधिकृत समजले जाईल.*

(8) ***All*** *questions can be attempted only in one language either in* ***English*** *or in* ***Marathi*** *as per the option given in the application form.*
*उमेदवाराने अर्जामध्ये दिलेल्या पर्यायानुसार* ***सर्व*** *प्रश्नांची उत्तरे* ***इंग्रजी*** *किंवा* ***मराठी*** *यापैकी एकाच भाषेत लिहिली पाहिजेत.*

(9) *Candidates are expected to answer all the subquestions of a question together. If subquestion of a question is attempted elsewhere (after leaving a few pages or after attempting another question) the later subquestion shall be overlooked.*
*उमेदवाराने प्रत्येक प्रश्नातील उपप्रश्नांची उत्तरे एकत्र सोडवावयाची आहेत. प्रश्नातील एक उपप्रश्न एकीकडे व दुसरा दुसरीकडे (काही पृष्ठे सोडून वा अन्य प्रश्न सोडवून तदनंतर) सोडवल्यास, दुसरा उपप्रश्न दुर्लक्षित केला जाईल.*

---

**P.T.O.**

1. Distinguish the given below : **(Any four)** 10
   (a) Complaint and Information in cognizable cases
   (b) Wrongful restraint and Wrongful confinement
   (c) Cheating and Cheating by personation
   (d) Proved, disproved and not proved
   (e) Primary evidence and Secondary evidence
   (f) Abetment of a thing and Criminal conspiracy

   खालील मधील फरक स्पष्ट करा : **( कोणतेही चार )**
   (अ) फिर्याद आणि दखलपात्र प्रकरणांतील वर्दी
   (ब) गैर निरोध आणि गैर परिरोध
   (क) ठकवणूक आणि तोतयेगिरी करून ठकवणूक
   (ड) शाबीत, नाशाबीत आणि बिनशाबीत
   (इ) अव्वल पुरावा आणि दुय्यम पुरावा
   (फ) एखाद्या गोष्टीचे अपप्रेरण आणि फौजदारी पात्र कट

---

2. State the trial of warrant cases instituted otherwise than on Police report. 10
   पोलीस अहवालाव्यतिरिक्त अन्यथा दाखल केलेल्या वॉरंट खटल्यांची संपरीक्षा सांगा.

---

3. Write notes on **any two** : 10
   (a) Rules as to notice to produce
   (b) Dying declaration
   (c) Child witness
   (d) Order for custody and disposal of property pending trial in certain cases

   **कोणत्याही दोन** बाबींवर टीपा लिहा :
   (अ) हजर करण्याबाबतच्या नोटीशी विषयीचे नियम
   (ब) मृत्यूपूर्व जबाब
   (क) बाल साक्षीदार
   (ड) विवक्षित खटल्यांमध्ये संपरीक्षा प्रलंबित असेपर्यंत संपत्तीच्या अभिरक्षेचा व विल्हेवाटीचा आदेश

---

4. What is meant by burden of proof ? On whom does it lie ? Does the burden of proof shifts ? 10
   शाबितीची जबाबदारी म्हणजे काय ? ती कोणावर असते ? शाबितीची जबाबदारी पालटते का ?

---

5. Write notes on **any two** : 10
   (a) Court may alter charge
   (b) Reports of certain Government Scientific experts and their use
   (c) Diary of proceedings in investigation
   (d) Security for keeping the peace on conviction

   **कोणत्याही दोन** बाबींवर टीपा लिहा :
   (अ) न्यायालयाला दोषारोपात फेरबदल करता येणे
   (ब) विवक्षित शासकीय वैज्ञानिक तज्ञांचे अहवाल आणि त्यांचा वापर
   (क) अन्वेषणातील कार्यवाहीचा रोजनामा
   (ड) दोषसिध्दी झाल्यावर शांतता राखण्यासाठी जामीन

---

6. Answer the following : 5+5

(a) What are the presumptions as to offences under the Scheduled Caste and Scheduled Tribes (Prevention of Atrocities) Act, 1989 ?

(b) What is "enforcing social disabilities" on the ground of untouchability under the Protection of Civil Rights Act, 1955.

खालीलची उत्तरे लिहा :

(अ) अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, 1989 मधील गुन्ह्यां संदर्भात कोणती तथ्ये गृहीत धरली जातात ?

(ब) नागरी हक्क संरक्षण अधिनियम, 1955 अंतर्गत अस्पृश्यतेच्या आधारावर ''सामाजिक नि:समर्थता लादणे'' म्हणजे काय ?

---

7. Discuss in detail the provisions relating to "Unlawful assembly". 10

''बेकायदेशीर जमाव'' संबंधीच्या तरतुदी विस्ताराने चर्चा करा.

---

8. Write **any four** from the following : 10

(a) Various requirements of the Section 60 of the Indian Evidence Act

(b) Voluntarily

(c) Impeaching credit of witness

(d) Stolen property

(e) Force

(f) Cognizance of offences by Magistrates

खालील मधील **कोणतेही चार** लिहा :

(अ) भारतीय साक्षीपुरावा अधिनियम कलम 60 च्या विविध आवश्यकता

(ब) ईच्छापूर्वक

(क) साक्षीदाराच्या विश्वासार्हतेवर संशय घेणे

(ड) चोरीची मालमत्ता

(इ) बलप्रयोग

(फ) दंडाधिकाऱ्यांनी अपराधांची दखल घेणे

---

9. Write an essay on **any one** subject : 20

(a) Human Rights and their Protection

(b) Public Interest Litigation (PIL)

(c) The Virtual Courts and Access to Justice

**कोणत्याही एका** विषयावर निबंध लिहा :

(अ) मानवी हक्क व त्यांचे संरक्षण

(ब) जनहित याचिका

(क) आभासी न्यायालये आणि न्याय मिळविणे

---

10. Write a Judgment on following facts : 20

(Candidates shall write the facts in detail and write judgment based on their imagination power).

On dated 10 January, at 8:30 pm. 'A' closed and locked his shop and went home. On dated 11 January, at 9:00 am. 'A' went to his shop. That time 'A' found that his shop was open, locks were broken and cash ₹ 1,000 were stolen from counter. 'A' lodged report with city Police Station Chandrapur', and crime registered. Investigation Officer prepared spot Panchnama. On the basis of footage of CCTV camera, installed in the shop, accused was arrested. Disclosure statement of accused was recorded. Investigation Officer submitted chargesheet before the JMFC Court at Chandrapur.

On trial 'A' (PW1), spot panch (PW2), Investigation officer (PW3) and another panch on disclosure statement (PW4) supported to prosecution.

Assistant Public Prosecutor argued that accused was seen in the CCTV footage. The accused shown the spot of occurrence before panch. Thus, the charge proved.

Defence lawyer submitted that printout of the CCTV footage are not proved legally. There is no eye witness of the occurrence. Rest evidence is insufficient to prove the charge. Therefore accused may be acquitted.

खालील तथ्यांच्या आधारे निकालपत्र लिहा :

(उमेदवारांनी सदर तथ्ये तपशीलवार लिहावी व त्याबाबतचा निर्णय स्वत:च्या कल्पनाशक्तीवर लिहावा).

दि. 10 जानेवारी रोजी रात्री 8:30 वाजता 'अ' ने त्याचे दुकान कुलूपबंद केले आणि घरी गेला. दि. 11 जानेवारी रोजी सकाळी 9:00 वाजता 'अ' त्याचे दुकानात गेला. तेव्हा 'अ' ला आढळले की त्याचे दुकान उघडे होते, कुलूप तुटलेले होते व काऊंटर मधील ₹ 1,000 चोरीस गेले. 'अ' ने शहर पोलीस ठाणे चंद्रपूर येथे फिर्याद दिली व गुन्हा दाखल झाला. तपास अधिकारी ने घटनास्थळ पंचनामा तयार केला. दुकानात लावलेल्या सी.सी.टी.व्ही. कॅमेराचे फुटेज च्या आधारे आरोपीस अटक करण्यात आली. आरोपीचे निवेदन नोंदविले गेले. तपास अधिकाऱ्याने आरोपपत्र प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी यांचे न्यायालय, चंद्रपूर समक्ष दाखल केले.

खटला उभा राहीला तेव्हा 'अ' (सा. 1), घटनास्थळ पंच (सा. 2), तपास अधिकारी (सा. 3) व निवेदनाचा दुसरा पंच (सा. 4) यांनी सरकार पक्षाला पूरक साक्ष दिली.

सहाय्यक सरकारी अभियोक्ता ने युक्तिवाद केला की सी.सी.टी.व्ही. फुटेज मध्ये आरोपी दिसून आला. आरोपीने पंचासमक्ष घटनास्थळ दाखवले. यावरून दोषारोप सिद्ध झाला.

बचाव पक्षाच्या वकिलाने युक्तिवाद केला की सी.सी.टी.व्ही. फुटेज च्या मुद्रित प्रती (Printout) कायदेशीररीत्या सिद्ध केल्या नाही. घटनेचा प्रत्यक्ष साक्षदार नाही. इतर पुरावा पुरेसा नाही. म्हणून आरोपीला निर्दोष करावे.

-oOo-